२) विद्यार्थी गुणगौरव योजनेअंतर्गत आपल्या मुलाचा/मुलीचा विचार करण्याचा असेल तर त्यासाठी आपण प्रतिष्ठानचे आजीव सदस्य असणे आवश्यक आहे याची कृपया नोंद घ्यावी. आजीव सदस्य नसलेले आजीव सदस्य होऊ शकतात. सदस्य होण्यासाठी भरावयाची रक्कम खालीलप्रमाणे आहे.

**✻ आश्रयदाता : रु. १०,०००/-   ✻ हितचिंतक : रु. ५,०००/-   ✻ आजीव : रु. १,०००/-**

पालकाची स्वाक्षरी

नाव :

पूर्ण पत्ता :

दूरध्वनी क्रमांक/मोबाईल

दिनांक : सभासद क्रमांक

---

विशेष सूचना : १) माहिती सुवाच्च अक्षरात संपूर्ण भरून दि. ३० नोव्हेंबर, २०१९ पूर्वी पोहोचेल अशा बेताने खालील पत्त्यावर पाठवावी.

● **सौ. सुप्रिया प्रशांत भिडे,** (प्रमुख विद्यार्थी गुणगौरव योजना), १५, व्यंकटपुरा पेठ, फ्लॅट नं. ६, देविका अपार्टमेंट, मंगळवार तळे, सातारा - ४१५ ००२. फोन नं. : ०२१६२-२८४३५८ किंवा ९४२३८६६१७०. **e-mail : prashantbhide53@gmail.com**

# पावसाचे गणित

मृग नक्षत्रापासून पावसाळा सुरू झाला की, ठिकठिकाणांहून मुसळधार पावसाच्या, बंधारे-धरणे भरल्याच्या आणि धरणांतून पाणी सोडण्याच्या बातम्या येत असतात. कुठे किती आणि कसा पाऊस झाला, त्याच्याही बातम्या येत राहतात. अनेकदा हा पाऊस मिलीमीटर्समध्ये, सेंटीमीटर्समध्ये अथवा इंचात मोजला गेल्याचे पाहायला मिळते. पाऊस अशा विचित्र युनिटमध्ये कसा काय मोजतात, याचेही कुतुहल वाचकांना असते. शिवाय धरणातून सोडलेल्या पाण्याबाबतही आज एक हजार क्युसेक पाणी खडकवासला धरणातून सोडण्यात आले, असे संदर्भ दिसतात, वाचायला मिळतात. काय आहेत या संज्ञांमागील गणिते ? पाऊस का मोजतात मिलीमीटरमध्ये आणि काय अर्थ आहे क्युसेकचा ?

*क्युसेक म्हणजे काय ?* धरणातून पाणी सोडताना पाण्याचे प्रमाण क्युसेकमध्ये मोजले जाते. एक घनफूट प्रती सेकंद म्हणजेच एक क्यूब पर सेकंद याचा अर्थ क्युसेक असा होतो. आता वर आपण पाहिले की एक घनफूट पाणी म्हणजे २८.३१ लिटर्स पाणी. ज्यावेळी एखाद्या धरणातून १००० क्यूसेक पाण्याचा विसर्ग केला जातो, त्यावेळी १००० २८.३१ असे २८,३१० लिटर्स पाणी प्रती सेकंदाला नदीपात्रात सोडले जाते. कोणत्याही धरणातून जर २४ तासात सतत ११,५०० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग करण्यात आला तर त्या धरणाची पातळी २४ तासांनंतर १ टीएमसीने कमी झालेली असते.

*क्युमेक म्हणजे काय ?* क्युसेकमध्ये पाणी घनफुटांमध्ये मोजले जाते. तर क्युमेकमध्ये पाणी घनमीटर्समध्ये मोजले जाते. एक क्युमेक पाणी म्हणजे प्रतिसेकंद १००० लिटर्स पाणी. म्हणजेच १००० क्युमेक या प्रमाणात पाणी सोडले जात असेल तर १००० १००० असे १० लाख लीटर्स पाणी प्रतीसेकंद या वेगाने नदीपात्रात येत असते.

*पूर रेषा कशा आखतात ? पांढरी रेषा* - एखाद्या धरणातून ३०,००० कयुसेक वेगाने पाणी सोडले असता त्या नदीपात्राची पाणीपातळी जेथे पोहोचेल, ती रेषा 'व्हाईट लाईन' अथवा 'पांढरी रेषा' म्हणून ओळखली जाते. हा सर्वसामान्य पूर मानला जातो. *निळी रेषा* - २०-२५ वर्षांतून एखाद्या वेळेस नदीचे पात्र पांढरी रेषा ओलांडते. ज्यावेळी धरणातून ६०,००० क्युसेक वेगाने पाणी सोडले असता त्या नदीपात्राची पाणीपातळी जेथे पोहोचते ती रेषा 'ब्लू लाईन' अथवा 'निळी रेषा' म्हणून ओळखली जाते. *लाल रेषा* - ४०-५० वर्षांत अतिवृष्टीने नदीचे पात्र निळी रेषाही ओलांडते. ज्यावेळी धरणातून १,००,००० क्युसेक वेगाने पाणी सोडले असता त्या नदीपात्राची पाणीपातळी जेथे पोहोचेल ती रेषा 'रेड लाईन' अथवा 'लाल रेषा' म्हणून ओळखली जाते.

## शाश्वती

आला दिवस जगून घ्यावा
उद्याची काय शाश्वती
कोणत्या क्षणी ह्या देहाची
न कळे होईल माती॥
राग-लोभ, रुसवे-फुगवे
जेथल्या तेथ असू द्यावे
माफी मागून, कधी माफ करून
हसतमुखाने विसरून जावे॥

न उरते हातात काही
सुख, प्रतिष्ठा वा पैसा
आचरून कर्म जो अलिप्त राही
विरळाच मनुष्य ऐसा
एकत्र आहोत तोपर्यंतच
आहोत एकमेकांचे
न जाणो कधी होऊ
भक्ष्य आपण काळाचे॥

**- कु. प्राची भिडे,** चिंचवड, पुणे

# आवाहन

श्री. मधुकर त्रिंबक भिडे, जुन्नर हे आजीव सभासद असून त्यांचे चिरंजीव श्री. उदय यांच्या दोन्ही किडन्या निकामी असून त्यासाठी त्यांचेवर उपचार सुरू आहेत. त्या करिता श्री. मधुकर (वडील) आपली किडनी त्याला देणार आहेत. श्री. मधुकर हे पाच वर्षांपूर्वी जनता सहकारी बँक, जुन्नर येथून निवृत्त झाले आहेत व मुलगा उदय अशा परिस्थितीत सुद्धा जुन्नर येथे एका पतपेढी संस्थेत नोकरी करीत आहे. घरची परिस्थिती बेताचीच आहे. ह्या किडनी रोपणासाठी सुमारे ८ ते ८॥ लाख रुपये इतका खर्च संभावित आहे. मध्यंतरी मी स्वतः प्रतिष्ठानचेवतीने त्यांची भेट घेतली. त्यांची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे. जनता बँक कर्मचारी सुद्धा त्यांना मदत करीत आहेत. चित्तपावन संघ, पुणे माध्यमातूनही त्यांना २५ हजार रुपयांची मदत उपलब्ध करून दिली आहे. आपला एक भिडे बांधव अडचणीत आहे व त्याला मदतीचा हात म्हणून मी प्रतिष्ठानचेवतीने व्हॉटस् ॲपवरील ग्रुपवरून भिडे मंडळींना आवाहन केले त्यानुसार प्रतिसाद उत्तम मिळून सुमारे ३५ हजार रुपये आजपावेतो जमा झालेले आहेत. त्याप्रमाणे ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात रु. २५ हजार त्यांच्या वैद्यकीय खर्चासाठी पहिल्या टप्प्यात त्यांना दिले आहेत. ह्याशिवाय सुद्धा आपल्याकडे असलेल्या वैद्यकीय मदतनिधीमधून शक्य तितकी मदत देणार आहोत. तरीसुद्धा आपल्या भिडे मंडळींना प्रतिष्ठानचे वतीने इच्छेनुसार मदत द्यावी असे आवाहन करतो आहे. हा आर्थिक मदतीचा हात प्रतिष्ठानच्या माध्यमातून देणार आहोत त्यासाठी ८० जी सवलत सुद्धा मिळेल. मदतीसाठी धनादेश नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान ह्या नावानेच द्यावा किंवा ऑनलाइन सुद्धा ठाणे जनता सहकारी बँक, पुणे येथे पाठविता येईल.

**- दिलीप भिडे,** सचिव/विश्वस्त
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

**सोशल मिडियावर (उदा. फेसबुक, व्हॉट्सॲप इ.) 'आम्ही भिडे' वा तत्सदृश नावाने काही ग्रुप असतील तर सदर ग्रुप नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानचे अधिकृत नाहीत, ह्याची कृपया नोंद घ्यावी.**

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान विवाह वाढदिवसाच्या शुभेच्छा !**

**ऑक्टोबर**

श्री. संदीप व सौ. सुकृता भिडे, अंमळनेर २५-१०-१५
श्री. नारायण व सौ. लता भिडे, जबलपूर २७-१०-८२

**नोव्हेंबर**

श्री. जयराम व सौ. केतकी भिडे, सोलापूर २५-११-८८
श्री. अमोद व सौ. धनश्री भिडे, सांगली २७-११-८८
श्री. सिद्धार्थ व सौ. केतकी भिडे, सांगली २८-११-१४

**डिसेंबर**

श्री. श्रीपाद व सौ. मृण्मयी भिडे, तळेगाव २-१२-०१
श्री. श्रीकांत व सौ. जयश्री भिडे ८-१२-७४
श्री. बळवंत व सौ. संध्या भिडे, अंमळनेर ३१-१२-८५

# एक सुरेल आवाज

**शब्दांकन : दिलीप भिडे, पुणे**

कु. शमिका श्रीकांत भिडे, रत्नागिरी ही 'योजक'च्या नानासाहेब भिडे, रत्नागिरी यांची नात. २००८ मध्ये ती १४ वर्षांची असताना सारेगमप लिट्ल चॅम्पस् स्पर्धेमधीला अंतिम फेरीच्या ६ स्पर्धकांपैकी एक होती. तिचे शालेय शिक्षण रत्नागिरी येथे झाले. ती बी.बी.एम.-आय.बी., एम.बी.ए. असून प्राथमिक संगीत श्री. प्रसाद गुळवणी व मुग्धा सामंत त्यांनतर डॉ. अश्विनी भिडे-देशपांडे, अशोक पत्की अशा संगीत तज्ज्ञांकडे झाले. सारेगमप लिटिल् चॅम्पस् नंतर संगीत क्षेत्रात तिने आपल्या गोड आवाजामुळे एक अस्तित्व निर्माण केले. त्यामध्ये शास्त्रीय संगीताच्या स्पर्धा, ऑल इंडिया रेडिओ, दादर माटुंगा येथील कला सेंटर, प्रशांत दामले फॅन क्लब अशा अनेक स्पर्धांमध्ये स्पृहणीय यश मिळविले. 'आठवा स्वर', 'सावळे परब्रह्म', 'शब्दावरी', 'पावला गणराज' असे अनेक अल्बमही प्रसिद्ध झाले. 'यारों की यादी' ह्या सिनेमामध्ये स्वप्निल बांदोडकरबरोबर 'प्रेम जाहले' हे गीत गायिले आहे. तसेच 'सखी', 'एक विश्वास' ह्या सह्याद्री सिरीजची टायटल साँग अशोक पत्की ह्यांनी स्वरबद्ध केलेले 'चमचम करिती तारे' हे गीत गायले आहे. यू ट्यूबवर 'सोयरे', 'आषाढ घन', शुभम वास्तू हे जिंगल' अशा वैविध्यपूर्ण आविष्कारांनी आपला ठसा उमटविला आहे. त्यामुळे २००८ मध्ये शनिवारवाडा कला महोत्सव पुणे, २००९ मध्ये श्रावणधारा, भिडे प्रतिष्ठान, २०१० मध्ये रत्नागिरी महोत्सव, पुलोत्सव, राज्य नाट्य संमेलन रत्नागिरी, २०११ मध्ये शिमगोत्सव गोवा, वसंतोत्सव ठाणे, चित्पावन ब्राह्मण संघ, पुणे, २०१२ मध्ये शाहू पुरस्कार, जयसिंगपूर, महाराष्ट्र मंडळ ऑस्ट्रेलिया आणि हैद्राबाद, गोवा फिल्म फेस्टीवल अशा अनेक पुरस्कारांनी तिला सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रातील नामांकित गायिकांमध्ये तिचे नाव आवर्जून घेतले जाते. तिला नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान आणि समस्त भिडे परिवाराकडून तिच्या भावी यशासाठी हार्दिक शुभेच्छा.



## जुलै ते सप्टेंबर २०१९ पर्यंतचे देणगीदार

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मिलींद दिगंबर भिडे, छत्तीसगड | रु. ५,००० | श्री. उदय भिडे |
| २) | श्री. नारायण वसंत भिडे, जबलपूर | रु. १०,००० | वैद्यकीय |
| ३) | श्री. प्रशांत सदानंद भिडे, सातारा | रु. ३,००० | निधी |
| ४) | श्री. जयराम भिडे, सोलापूर | रु. २,००० | ,, |
| ५) | ॲड. विनोद यशवंत भिडे, औरंगाबाद | रु. ५,००० | ,, |
| ६) | श्री. पूर्णचंद्र विनायक भिडे, चिंचवड | रु. १,००० | ,, |
| ७) | ले. क. सुनिल वासुदेव भिडे, पुणे | रु. ३,००० | ,, |
| ८) | सौ. जान्हवी जितेंद्र गोंधळेकर, देवघर | रु. २,००० | ,, |
| ९) | सौ. मिताली मंदार भिडे, रत्नागिरी | रु. ३,००० | ,, |
| १०) | श्री. मिलींद दिगंबर भिडे, छत्तीसगड | रु. १०,००० | देणगी |
| ११) | श्री. मधुसुदन धोंडू भिडे, डोंबिवली | रु. ५,००० | देणगी |
| १२) | सौ. मेघना आशिष भिडे, पुणे | रु. १,००० | आजीव सभासद |
| १३) | श्री. अमित दिलीप भिडे, पुणे | रु. १,००० | आजीव सभासद |
| १४) | सौ. पूनम अमित भिडे, पुणे | रु. १,००० | आजीव सभासद |
| १५) | सौ. प्राजक्ता पूर्णचंद्र भिडे, चिंचवड | रु. १,००० | आजीव सभासद |
| १६) | कु. प्राची पूर्णचंद्र भिडे, चिंचवड | रु. १,००० | आजीव सभासद |
| १७) | श्री. मधुसुदन धोंडू भिडे, डोंबिवली | रु. १,००० | आजीव सभासद |
| १८) | श्री. प्रशांत मधुसुदन भिडे, डोंबिवली | रु. १,००० | आजीव सभासद |
| १९) | श्री. वेदांग प्रशांत भिडे, डोंबिवली | रु. १,००० | आजीव सभासद |
| २०) | श्री. मकरंद गोविंद भिडे, कल्याण | रु. १,००० | आजीव सभासद |
| २१) | श्री. आशिष गोविंद भिडे, कल्याण | रु. १,००० | आजीव सभासद |
| २२) | कु. उदित आशिष भिडे, कल्याण | रु. १,००० | आजीव सभासद |

**साद–प्रतिसाद :** श्री. मिलींद दिगंबर भिडे (छत्तीसगड) यांनी आर्थिक परिस्थिती कमकुवत असलेल्या कन्येच्या विवाहासाठी रु. १० हजार आर्थिक मदत प्रतिष्ठानकडे जमा केली आहे. त्यानुसार भिडे कुलोत्पन्नातील व्यक्तीने प्रतिष्ठानकडे संपर्क करावा. (९६५७५४१२३६)

## अभिनंदन !



पितांबरी आणि व्यास क्रिएशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने १० जून रोजी झालेल्या राज्यस्तरीय पितांबरी कंठवटी अभिवाचन स्पर्धेत **श्री. आशिष धुंडिराज भिडे,** नालासोपारा यांना प्रथम पारितोषिक मिळाले. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन ! ह्या स्पर्धेमध्ये एकूण ७०० स्पर्धकांनी सहभाग घेतला. त्यामधून निवडलेल्या १२० स्पर्धकांमधून श्री. आशिष यांनी हे यश मिळविले आहे.



**श्री. शंतनु शैलेश भिडे, सांगली** यांना अहमदाबाद येथे नुकत्याच झालेल्या ऑल इंडिया मावळकर शूटींग (छोटा पिस्तुल) स्पर्धेमध्ये कास्य पदक मिळाले. त्याबद्दल नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानकडून हार्दिक अभिनंदन आणि भावी यशासाठी मनोमन शुभेच्छा.



इंडोनेशिया येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय स्केटींग स्पर्धेमध्ये **कु. नियती मंदार भिडे,** डोंबिवली हिने ब्राँझ मेडल मिळविले. त्यासाठी नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानकडून तिचे अभिनंदन आणि शुभेच्छा. कु. नियती तिसऱ्या इयत्तेमध्ये शिकत असून आंतरराष्ट्रीय स्केटींग स्पर्धेसाठी तिची निवड झाली. एकूण सहा देश सहभागी झाले होते त्यामध्ये भारताला एकूण २६ पदके मिळाली.



मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक व प्रशासकीय अधिकारी **सौ. अश्विनी भिडे** यांना झी मराठीचा उंच माझा झोका पुरस्कार २०१९ दि. २५ ऑगस्ट २०१९ रोजी देऊन गौरविण्यात आले. फिल्डवरच्या अनुभवी प्रशासकीय अधिकारी म्हणून ओळखल्या जातात. १९९५ च्या आय.ए.एस. बॅचच्या यूपीएससी परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणारी महिला तसेच भिडे प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून आपल्या संस्थेशी निगडित आहेत. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन !

# कुल संमेलने

संकलन : दिलीप भिडे, पुणे.
मो. ९६५७५४१२३६

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानची स्थापना झाल्यापासून सर्व भिडे मंडळींना एकत्र येण्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभा एवढेच माध्यम होते.त्यामुळे त्याच दिवशी ज्येष्ठांचा सत्कार व विद्यार्थी गुणगौरव हे कार्यक्रम त्याच्याअंतर्गत एक दिवसाचे होत असत. परंतु २००३ मध्ये झालेल्या ५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेपासून ज्येष्ठ सत्कार व विद्यार्थी गुणगौरव हे कार्यक्रम वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये न घेता भिडे कुल संमेलन हा कार्यक्रम वेगळ्या दिवशी ठेवून त्यामध्ये त्यांचा अंतर्भाव असावा असे ठरले. त्याप्रमाणे प्रतिष्ठानचे सध्याचे पदाधिकारी श्री. कुमार भिडे ह्यांनी विशेष पुढाकार घेऊन सांगलीचे रविकाका, विवेक, सौ. अंजली भिडे, श्यामराव व विकास ह्या भिडे मंडळींनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन सांगली येथे २० ऑक्टोबर २००३ रोजी पहिले भिडे संमेलन संपन्न झाले. वास्तविक सांगली येथील संमेलन ४ थे. परंतु वेगळ्या दिवशी परंतु वार्षिक सभेव्यतिरिक्त झालेले हे पहिले भिडे कुल संमेलन. विशेष म्हणजे ह्याच संमेलनामध्ये 'आम्ही भिडे' ह्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले.

भिडे कुल संमेलन तारीख, ठिकाण व अध्यक्ष ह्या बाबतचा इतिहास देण्याचे कारण म्हणजे डोंबिवली भिडे कुल संमेलनात शेवटच्या सत्रामध्ये झालेल्या परस्पर संवाद व चर्चा ह्या कार्यक्रमामध्ये उपस्थित असलेल्या भिडे मंडळींना आतापर्यंत झालेल्या कुलसंमेलनांबद्दल माहिती असणे अपेक्षित होते. परंतु उशिरा का होईना ही माहिती आपण प्रसारित करीत आहोत. ह्याबद्दल आपल्याकडे काही आठवणी, प्रतिक्रिया असतील तर त्याचा तपशील 'आम्ही भिडे' अंकात जरूर प्रसारित करू.

| अ.क्र. | संमेलन साल | ठिकाण | तारीख | अध्यक्ष |
|---|---|---|---|---|
| १. | १९९९ | अभिरुची, पुणे, भिडे बाग | १७ जानेवारी | डॉ. सतीश व डॉ. सौ. अश्विनी भिडे, नागपूर |
| २. | २००२ | रत्नागिरी, गुरुकृपा कार्यालय | २१ एप्रिल | श्री. नाना भिडे (योजक), रत्नागिरी |
| ३. | २००२ | पुणे, नू.म.वि.विद्यालय | २० ऑक्टोबर | श्री. मनोहर गोपाळ भिडे, माभळे (अध्यक्ष, बँक ऑफ इंडिया) |
| ४. | २००३ | सांगली, भिडे कार्यालय | ३० नोव्हेंबर | श्री. प्रदीप ज. भिडे, मुंबई (अध्यक्ष, भिडे प्रतिष्ठान) |
| ५. | २००५ | पुणे, तळेगाव दाभाडे | ११ डिसेंबर | डॉ. वि. ग. भिडे (कुलगुरू, पुणे विद्यापीठ), पुणे |
| ६. | २००७ | पुणे, चाफेकर हॉल | २३ डिसेंबर | श्री. श्रीधर गोपळ भिडे, मुंडाजे, कर्नाटक आणि श्री. संजय शंकर भिडे, मुंबई |
| ७. | २००९ | किहीम (अलिबाग), वक्रतुंड बंगला | १ फेब्रुवारी | डॉ. गोविंदराव भिडे, मुंबई |
| ८. | २०१० | गणपतीपुळे, रत्नागिरी | १५ व १६ जानेवारी | डॉ. विवेक य. भिडे (सरपंच, गणपतीपुळे), रत्नागिरी |
| ९. | २०११ | मुंडाजे, कर्नाटक लक्ष्मी-नारायण मंदिर | १६ जानेवारी | श्री. प्रदीप व डॉ. शीला भिडे, दिल्ली (आय.ए.एस. सनदी अधिकारी) |
| १०. | २०११ | पुणे (चित्पावन) टिळक विद्यापीठ | २५ डिसेंबर | मेजर जनरल संजय वामन भिडे, पुणे |
| ११. | २०१३ | सातारा, हॉटेल सुरुबन | १२-१३ जानेवारी | श्री. दत्तात्रय भिडे, सातारा |
| १२. | २०१४ | डोंबिवली | ४-५ जानेवारी | श्री. प्रदीप जगन्नाथ भिडे, मुंबई |
| १३. | २०१५ | संगमेश्वर, रत्नागिरी लक्ष्मी-नारायण | १६-१७ जानेवारी | डॉ. सौ. मधुरा अतुल भिडे, माभळे/पुणे |
| १४. | २०१६ | नाशिक, पिंपळगांव | २३-२४ जानेवारी | ॲड. अविनाश भिडे, नाशिक |
| १५. | २०१७ | श्रीवनदेवी मंदिर, डिचोली, गोवा | २१ व २२ जानेवारी | श्री. प्रभाकर भिडे, रायबंदर, गोवा |
| १६. | २०१८ | श्रीदुर्गादेवी मंदिर, गुहागर | ६ व ७ जानेवारी | श्री. मनोहरपंत भिडे, माभळे, संगमेश्वर |
| १७. | २०१९ | राजमती भवन, सांगली | १२ व १३ जानेवारी | अध्यक्षा - डॉ. सुचेता भिडे-चापेकर, पुणे स्वागताध्यक्ष - श्री. चंद्रशेखर भिडे, सांगली |
| १८. | २०२० | ज्येष्ठ नागरिक संघ सभागृह, पनवेल शहर | ४व ५ जानेवारी | |

पर्थच्या निमित्ताने ...

# मातृभूमीचे महत्त्व - नाते मातीशी

जीवनात मातेइतकेच महत्त्व मातृभूमीला असते. मातृभूमीविषयी प्रेम ही एक नैसर्गिक भावना आहे. सहाशे वर्षांपूर्वी इ.स. १४ व्या शतकात मोगल बादशहा बाबर अफगाणिस्तानामधून मजल दरमजल करीत हजारो सैन्य व आपल्या सरदारांबरोबर हिंदुस्थानात आला. येथे प्रचंड लढाया, रक्तपात करून हिंदुस्थानात मोगली सत्तेचा पाया घातला. दिल्ली जवळील आग्रा येथे राजधानी वसवून प्रचंड धन, संपत्ती, सत्ता मिळवली. त्यावेळी त्याच्याबरोबर आलेले सरदार व सैन्य अफगाणिस्तानात परत गेले. त्याचा खास दोस्त सरदार खाजा खिलान पत्रातून त्याला विचारी की (आपली मातृभूमी) काबूल कंदाहारला तू परत केव्हा येणार ? तोही उलट टपाली कळवे की येथली राज्य कारभाराची व्यवस्था मार्गी लागली की येथे एक क्षणभरही थांबणार नाही. लहानपणी आनंदात निसर्ग ओढ्याकाठी घालविलेले क्षण मी कसा विसरेन ? तेथे मातृभूमीत (मातीत) घालविलेले दिवस, तेथील निसर्ग, अनुपम सृष्टीसौंदर्य कधीच विसरणार नाही.

प्रचंड मोगली साम्राजाची व्यवस्था करताकरता एक दिवस वयाच्या ४८ व्या वर्षी आपला मुलगा युवराज हुमायून याच्या हाती सत्ता देऊन बाबर पैगंबरवासी झाला. पण मरताना त्याने लिहून ठेवले की आपली कबर अफगाणिस्तानात काबूल येथे (लहानपणी खेळलेल्या) झऱ्याच्या काठी बांधावी. आजही मोगल सम्राट बाबर याची कबर काबूल येथे आहे. पुढे हुमायून-शहाजहान-अकबर यांनी आपले साम्राज्य प्रचंड मोठ्या प्रमाणात (बंगाल, बिहार ते दक्षिणेत हैद्राबाद) वाढविले. इंग्रज येईपर्यंत सहाशे वर्षे राज्य केले. पण ज्या बाबराने मोगली सत्ता स्थापन केली त्याला आपली नाळ मातृभूमीपासून तोडता आली नाही. मनुष्य कितीही मोठा झाला, त्याने कर्तृत्वाने आकाशाला गवसणी घातली तरी त्याची नाळ आपल्या मातीशी बांधलेली असते. म्हणूनच स्वातंत्र्यवीर सावरकर आय.सी.एस. होण्यासाठी लंडनला गेले. तेथे त्यांना भारतीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणारे रामजी कृष्ण वर्मा भेटले. साहजिकच त्यांनी शिक्षणापेक्षा मातृभूमीच्या स्वातंत्र्याला महत्त्व दिले. इतकेच नव्हे तर आपली प्रतिभा मातृभूमीच्या चरणी वाहिली. त्यांनी पहिले पुस्तक लिहिले जोसेफ मॅजिनीचे आत्मचरित्र. कोण होता जोसेफ मॅजिनी ? तो होता इटलीचा स्वातंत्र्य सैनिक. ज्याने इटलीच्या स्वातंत्र्याकरिता आपले प्राण वाहिले. त्या अलौकिक स्वातंत्र्य सेनानीचे चरित्र लिहून सावरकरांनी देशबांधवांना अर्पण केले. ते एकदा लंडनला समुद्र किनाऱ्यावर बसले असता त्यांच्या मनात विचार आले की हाच महासागर माझ्या मातृभूमीला हिंदुस्थानला जोडला गेला आहे. पण मी तिकडे जाऊ शकत नाही. त्याचक्षणी त्यांची सर्वमंगल प्रतिभा जागृत झाली. त्यातून एक अजरामर गीत जन्माला आले. 'ने मजसी ने परत मातृभूमीला... सागरा प्राण तळमळला' या गीतामध्ये त्यांनी लिहिले आहे की येथे सर्व वैभव आहे पण मला आईची झोपडी प्यारी आहे. ते सागराला दम देतात की जर तू मला हिंदुस्थानात नेले नाहीस तर मी तुला ऋषी अगस्तीची आठवण करून देईन ज्याने एका दमात सागर गिळला होता. त्यांनी इ.स. १९०९ साली इंग्लंडला हे गीत लिहिले. त्याला शंभर वर्षे होऊन गेली. तरी आपण अनेक समारंभात ते गातो. ते लतादीदींनी आपल्या नादमधुर (आवाजाची देणगी लाभलेल्या) आवाजात गायले आहे. त्याला प्रसिद्ध संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांनी अवीट गोडीची चाल दिली आहे. त्यावेळची लताबाईंची एक आठवण प्रसिद्ध आहे. त्यांना तात्याराव सावरकरांचा अभिमान होता. त्या आपले वडील दीनानाथ मंगेशकरांबरोबर सावरकरांना भेटायला गेल्या होत्या. त्यांनी सावरकरांना विचारले की तुम्ही देशासाठी इतके करता पण मी काय करू ते सांगा. सावरकरांनी लताबाईंना सांगितले की तुझ्या गळ्यात गंधार राग आहे. तुला जन्मजात अलौकिक आवाजाची देणगी आहे. तरी तू लोकांकरिता, देशाकरिता गाणी म्हण. लोकांना सुंदर गाणी ऐकवून समृद्ध कर, समाधानी कर व देशभक्तीची प्रेरणा दे. म्हणूनच बहुधा १९६२ सालच्या चिनी हल्ल्यानंतर दिल्लीला झालेल्या जाहीर कार्यक्रमात गाणी म्हणण्यासाठी लताबाईंना बोलविले गेले. त्यावेळी पंतप्रधान पंडित नेहरू हजर होते. लताबाईंचे गाणे ऐकून त्यांच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहू लागले. त्या गाण्याला आता साठ वर्षे झाली. ते गाणे होते -
'ए मेरे वतन के लोगो। ...जरा याद करो कुर्बानी॥' त्या कार्यक्रमाचे निवेदन प्रसिद्ध अभिनेते दिलिपकुमार यांनी केले होते. ते लताबाईंना आपली बहीण मानत असत. अशा अनेक प्रसंगांतून मातृभूमीच्या प्रेमाचे दर्शन होते.

देशभक्त सुभाषचंद्र बोस यांनी तर मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सिंगापूरला आझाद हिंद सेना स्थापन केली व घोषणा दिली 'चलो दिल्ली' ते म्हणत 'तूम मुझे खून दो, मै तुम्हे आजादी दूँगा।' अशी देशाची सेवा करता करता आपले प्राण दिले. ते कोठे गेले ते लोकांना शेवटपर्यंत कळलेच नाही. इतके ते देशाशी एकरूप झाले होते. आता देश स्वतंत्र झाला. अनेक लोक नोकरी, व्यवसायानिमित्त देश-विदेशात जातात. पण तेथेही आपल्या बांधवांबरोबर एकत्र येऊन सण-महोत्सव साजरे करतात. ते आपल्या नैसर्गिक मातृभावनेने आपोआपच जोडले जातात. मग निमित्त शिवजयंती असो, नवीन वर्षप्रतिपदा असो, एक मे असो किंवा गणपती उत्सव असो. यातूनच एक प्रकारे देशभक्तीची मातृभावना प्रकट होते. आपल्या देशावर काहीही संकट, आपत्ती आली की हे लोक लगेच मदतीला धावून येतात. यावर्षी पर्थ-ऑस्ट्रेलिया येथे मुलाबरोबर नवीन वर्ष साजरे करताना एकत्र आलेले मराठी 'पर्थवासी' बघून हीच भावना उचंबळून आली. त्यांच्याबरोबर नवीन वर्ष साजरे करता आले. एक विलक्षण भाग्य योग माझ्या नशिबात होता. येथील मराठी भगिनींनी झी मराठीवरील लोकप्रिय 'होम मिनिस्टर' साजरा केला. कौतुकाची गोष्ट म्हणजे त्यात साठ भगिनींनी भाग घेतला. विविध राऊंड पार पडले. शेवटच्या फेरीत फक्त सात महिला उरल्या.त्यातील पहिल्या आलेल्या महिलेस पैठणी व आणखी दोन क्रमांकाना आकर्षक पारितोषिके देण्यात आली. येथे इतके (अंदाजे ३००) मराठी लोक एकत्र येऊन आनंदाने गुढीपाडवा साजरा करतात हे बघून अतिशय कौतुक वाटले.

मुंबईत 'होम मिनिस्टर' साकारणारे आदेश बांदेकर यांच्या हस्ते भगिनींना मिळणारा पैठणीचा सुंदर योग आमच्या उभयतांच्या हस्ते पार पडला. याबद्दल स्वतःला धन्य वाटले. याप्रसंगी पाहुण्यांच्या नात्याने बोलताना सांगतले की असेच प्रसंगाप्रसंगाने एकत्र या. आपुलकी, जिव्हाळा निर्माण करा. कारण प्रसिद्ध साहित्यिक पु.भा.भावे यांनी एके ठिकाणी म्हटले आहे की 'आपुलकीची ज्योत पेटवायची असेल तर सहवासाचे तेल द्यावे लागते.' याप्रसंगी होम मिनिस्टर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणाऱ्या संदेश कोयंडे याचे कौतुक करावे तेवढे थोडेच. त्यानी ज्या तडफेने, अत्यंत खेळकर, गमतीदार पद्धतीने सादरीकरण केले. मला तर तो आदेश बांदेकरला उत्तम पर्याय वाटला. नियोजनबद्ध उत्तम कार्यक्रमात माझ्यासारख्या पाहुण्यांना संधी दिल्याबद्दल कृतज्ञता व आभार. **- प्रभाकर शं. भिडे, डोंबिवली.**

**व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठी तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एकदा देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा !**

# भोगवादातून त्यागवादाकडे...

सध्याची स्थिती आणि माणूस यांचा समन्वय ह्या धकाधकीच्या जीवनात कसा लावावा हा आज अनेक लोकांपुढे प्रश्न उभा आहे. विज्ञानाचा वेग खूप आहे. अत्यंत वेगाने नवीन नवीन शोध लागत आहेत. सुखसोयींची बरसातच होत आहे माणसावर ! पण अनंतपटींनी माणसाच्या गरजाही वाढत आहेत. आपल्याला सतत काहीतरी नवं हवंय. एक मिळालं की दुसरं काहीतरी आकर्षित करत आहे. लगेच ते मिळविण्यासाठी धडपड चालू. हे कुठेतरी थांबलं पाहिजे. अनंत गरजांबरोबरच अनंत इच्छा वाढतच जातात. इच्छा पूर्ण करण्यासाठी मानव जिवाचे रान करतो. पण ती भोग्य वस्तू प्राप्त झाल्यावर जो आनंद मिळतो तो आनंद काही काळच टिकतो. माणूस सुखाच्या मागे लागला आहे. पण ह्या नश्वर वस्तू मिळविणे म्हणजे मृगजळाने तृष्णा भागविण्यासारखे आहे.

ऐहिक सुखाने आपल्या आत्म्याला चिरंतन सुख प्राप्तच होत नाही. तसे असते तर सर्वात प्रगत राष्ट्र अमेरिका, तेथे ऐश्वर्याचा हिमालय असून सुद्धा अतृप्त जीवन जगत आहेत. खऱ्या सुखशांतीला आणि समाधानाला ते लोक आज पारखे झाले आहेत. आता त्यांनाही वाटू लागलंय की भोगवादी जीवन हे खरं आनंदी जीवन नाही. म्हणून तर 'हरे राम हरे कृष्ण' सारखी संस्था उभारून हे गोरे लोक देहभान हरपून त्या प्रेमानंदाचा रस चाखत आहेत. पण आज पाश्चात्यांच्या अनुकरणाने ह्या आर्यावर्तातील लोकांना झपाटले आहे. पूर्णपणे इंग्रजाळले आहेत. त्याच शिक्षणभट्टीतून आज समाजास संस्कार दिले जातात.

पवित्र आणि जगद्वंद्य सीता-सावित्रीचा आदर्श सोडून सिनेनट्यांचा भोगवादी आदर्श समोर धरतात. जीवनात त्याग केल्याशिवाय कीर्तिचे शिखर गाठता येत नाही असे सांगणाऱ्या झाशीची राणी, अहिल्याबाई, राजमाता जिजाबाई या सर्वांचे आदर्श आज दुर्लक्षित होत आहे. परकीय संस्कृतीचे दूध, बाळकडू म्हणून आज आमच्या बालकांना दिले जात आहे. त्यामुळे आपलं म्हणून जे काही आहे ते उध्वस्त होत आहे. आमचे आचार, विचार, संस्कृती, चालीरिती, पोषाख हे सारे पाश्चात्यांना आवडू लागलंय. त्यांच्या शाळांमध्ये भगवद्गीता शिकवली जाऊ लागली आहे आणि आपली तरुण मुले पॉपसंगीत ऐकण्यात मोठेपणा समजतात, स्टेटस समजतात.

मानवाच्या जीवनात तर सत्य सुख शोधायचा प्रयत्न असेल तर तो भोगापेक्षा त्यागात आहे. थोर पुरुषांचा व संतांचा इतिहास बघितला तर लक्षात येईल की त्यांना त्यागातून व दुःखातून चिरंतन सुख प्राप्त झालंय. संपत्तीपेक्षा विपत्तीतूनच ते मोठे झाले, महान ठरले.

अतिअल्पकाळ जगून सुद्धा ज्ञानदेव आपल्या जीवनाचे आदर्श ठरू शकले. कारण संत हे भोगवादी नसून त्यागवादी असतात. अनेक स्वातंत्र्य सैनिक राष्ट्रसंत यांनी आपल्या सुखापेक्षा देशाच्या हिताचा विचार केला म्हणूनच आपण स्वातंत्र्याची गोड फळे चाखत आहोत.

आजच्या युगातील भोगाचा उदोउदो करून जे कवटाळत आहेत त्याला बहुतांशी कारण विज्ञानाचे शोध-बोध. अगदी चंद्रावर उड्डाण करून मानवाची निर्मिती देखील टेस्टट्यूब द्वारा करू शकतो. मग देव, धर्म, संस्कृती याची गरजच काय ? असा प्रश्न साहजिकच पडू शकतो. पण मृत्यूवर जोपर्यंत विजय मिळवू शकत नाही तोपर्यंत सर्वशक्तिमान ईश्वराचीच शक्ती या जगात आहे हे मान्य करावच लागेल. नीतिमूल्यांची जोपासना करण्यासाठी तरी धर्म व संस्कृतीची गरज आहे. नाहीतर समाज अधोगतीला जाईल. उदाहरणच द्यायचे झाले तर आईच्या आज्ञापालनासाठी प्रभू रामचंद्र १४ वर्षे वनवासात गेले. मातापित्याला वृद्धाश्रमात पोहोचविणारा रामचंद्र आजच्या युगात नमाण झ्रिाली.

धर्म व संस्कृतीच्या संस्कारानेच मानवाच्या जीवनात आनंद व सुख प्राप्त होते. नीतिमूल्ये जोपासली जातात. मग तो कुठलाही धर्म असो, प्रत्येक धर्मात आदर्श तत्त्वे आहेतच. खोटे बोलू नये, मद्यपान करू नये, दया, क्षमा, शांती, अहिंसा इत्यादी अनेक मूल्यांचा समावेश यात आहे. अंधाराचा फायदा घेऊन केलेले पापसुद्धा पाहणारा परमेश्वर या जगात आहे व तो मला जन्मजन्मांतरीची शिक्षा भोगायला लावेल, यासाठी सदाचाराने जीवन जगावे असा भाव रुजवला की भोगवाद जाऊन आदर्शवाद रुजतो. पण यासाठी विज्ञानाला धर्माची जोड हवी. विज्ञानरूपी रथाला धर्म आणि देव अशी दोन चाके लावली पाहिजेत आणि संस्कृतीचा लगाम हाती घेतला पाहिजे म्हणजे मनरूपी घोडे बरोबर परमानंदाकडे वळतील. सगळीकडे स्वच्छ, निरामय आनंदाची निर्मिती होईल.

**- सौ. प्राजक्ता पू. भिडे,**
चिंचवड, पुणे. मो. ८८८८२३४७१८

**साप्ताहिक प्राजक्त**

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. संपादक : प्रफुल्ल डबीर फोन २५४०४२७

RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI * Reg. No. KLR 136/18-20 Posted in Kolhapur RMS